| | | |
|---|---|---|
| | **महाराष्ट्र शासन**<br>**जिल्हा परिषद,बीड (शिक्षण विभाग,प्राथमिक)**<br>**ई मेल :- mdmbeed@gmail.com** | |

**जा.क्र. जिपबी/शिविप्रा/RTE/ /कावि** **दिनांक : - / /2025**

No - 0630 22 JAN 2026

## नमुना दोन

ग्राम :- गेवराई दुरध्वनी : 9503072903 ईमेल:cambridgevallygeorai@gmail.com
व्यवस्थापक :- आधार फाउंडेशन गेवराई

**विषय:- बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 यांच्या कलम 18 च्याप्रजोजनार्थ, बालकांच मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2011 यांच्या नियम 11,पोटनियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपः देण्याबाबत**

मा. महोदय/महोदया,

आपला दिनांक 1/7/2026च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्र व्यवहार / शाळेची केलेली तपासणी य आधारे मी शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद बीड **दिनांक01/04/2025 पासून ते दि.31/03/2028 पर्यंत** तीन वर्षाच्य कालावधीसाठी **इ.01 ली ते 08 वी** करिता **द केंम्ब्रीज व्हॅली इंटरनॅशनल स्कुल,गेवराई** या शाळेस तात्पुरती मान्यता देण्यात येत आहे.

**वरील मान्यता ही खालील अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या आधीन आहे.**

1.मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इ.आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतीही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

2. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच अधिनियम 2011 (जोडपत्र-2) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.

3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित घटकातील बालकांना पहिल्या त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल. परंतु आणखी असे की,पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणांकाचे अनुपालन करण्यात येईल.

4. परिच्छेद 3 निर्दीष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळेल स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

5. संस्था / शाळा कोणतेही कॅपिटिशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकांस किंवा त्याच्या माता-पित्यास किंव पालकांस भाग पाडणार नाही.

6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

7 (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या कोणत्याही बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग /विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखं असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या त्यांची /तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील, आणि

(आठ) शिक्षकाने/ शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये याची सुनिश्चिती शाळा करेल.

8.शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेला अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

9.शाळा अधिनियमाचे कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधाचे तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

10. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधाचे खालील प्रमाणे होत्या.

| अ.क्र. | तपशिल | क्षेत्रफळ/संख्या/चौ.फुट | |
|---|---|---|---|
| 01 | शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | 160000 | चौ.फुट |
| 02 | एकुण बांधकाम क्षेत्र | 76000 | चौ.फुट |
| 03 | खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | 130000 | चौ.फुट |
| 04 | वर्ग खोल्यांची संख्या | 20 | |
| 05 | कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकांची खोली | 10 | |
| 06 | मुलांसाठी व मुलीसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल | होय | |
| 07 | पिण्याच्या पाण्याची सुविधा | होय | |
| 08 | दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वंयपाकघर | नाही | |
| 09 | अध्यापन,अध्ययन साहित्य/खेळ व क्रिडाविषयक सामुग्री/गंथालय यांची उपलब्धता वाचन साहित्य विनासायास उपलब्ध | होय | |

11 मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतर चालविता येणार नाहीत.

12.शाळेची इमारत/ इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्या करिता किंवा कोणताही नफा मिळवण्यासाठी चालण्यात येत नाही.

15. शाळेची लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षीत व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्र तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकांऱ्यांकडे पाठविण्यात यावी.

16. तुमच्या शाळेला मिळाला मिळालेला मान्यता युडायस क्रमांक 27270500151 असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्र व्यवहार करताना कृपया तो नमूद करावा याची नोंद घ्यावी.

17. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करीत असेल अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीच्या निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

18. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

19. जोडपत्र-3 नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

20.दि.13.05.2025 च्या शासन निर्णयाप्रमाणे शाळेत विद्यार्थी सुरक्षितेबाबत पुर्तता व दि.13.12.2025 च्या शासन निर्णयामधील सुचनानांचे पालन करण्याची जबाबदारी शाळेची राहील.

21.----------------------------------------------------------------------

**शिक्षणाधिकारी (प्रा)**
**जिल्हा परिषद,बीड**